| MHRG120001742018 | खटला दाखल दिनांक | : | २५-०६-२०१८ |
|---|---|---|---|
| | खटला नोंदणी दिनांक | : | २५-०६-२०१८ |
| | निकाल दिनांक | : | ०९-०३-२०२६ |
| | कालावधी : **०७ वर्ष, ०८ महिने, १४ दिवस** | | |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी मुरुड, जि. रायगड-अलिबाग.**
**(पीठासीन अधिकारी - घनःशाम रा. तिवारी)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०१८** (सरकार वि. राजेश सुंदरलाल बहल)
**आणि**
**नियमीत फौजदारी खटला क्र.११७/२०१८** (उपविभागीय अधिकारी अलिबाग वि.राजेश सुंदरलाल बहल) यांचा एकत्रीत निर्णय

**निशाणी क्र.७३**

| **नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०१८**<br>अपराध क्रमांक : ३०४३/२०१५, दिनांक २२.०८.२०१५ पोलीस स्टेशन : मुरूड | |
|---|---|
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे मुरूड, जि. रायगड. |
| महाराष्ट्र शासन तर्फे | श्री सतीश नाईक,सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **राजेश सुंदरलाल बहल,**<br>वय ६७ वर्षे, धंदा – व्यवसाय,<br>राहणार – नांदगाव, ता. मरुड, जि. रायगड |
| आरोपीकरिता/ तर्फे सादरकर्ता | विधीज्ञ श्री. एम.एम. ठाकुर |
| गुन्हा घडल्याची तारीख | २००० ते ०५.०७.२०१५ |
| गुन्हा नोंदणी तारीख | २२.०८.२०१५ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | २५.०६.२०१८ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०३.०२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २९.०४.२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | ०९.०३.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख जर असेल तर | निरंक |

| नियमीत फौजदारी खटला क्र. ७४/२०१८ (उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याव्दारे पर्यावरण (संरक्षण ) अधिनियम कलम १५ नुसारची फिर्याद | |
|---|---|
| फिर्यादी | उपविभागीय अधिकारी, अलिबाग |
| फिर्यादी तर्फे | श्री सतीश नाईक, सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **राजेश सुंदरलाल बहल,**<br>वय ६७ वर्षे, धंदा – व्यवसाय,<br>राहणार – नांदगाव, ता. मरुड, जि. रायगड |
| आरोपीकरिता/ तर्फे सादरकर्ता | विधीज्ञ श्री. एम.एम. ठाकुर |
| गुन्हा घडल्याची तारीख | १९९१ ते १९.१०२०१८ |
| फिर्याद दाखल तारीख | १९.१०.२०१८ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | १९.१०.२०१८ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०३.०२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २९.०४.२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | ०९.०३.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख जर असेल तर | निरंक |

| आरोपी चा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोषमुक्त केले किंवा शिक्षा केली | किती शिक्षा दिली | खटला सुरु असतांना आरोपी कारागृहात असल्या बाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजेश सुंदरलाल बहल | निरंक | २५.०६.२०१८ | महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२,५३,५४ व ५५ भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ | निर्दोष मुक्त | लागू नाही | निरंक |

सरकार तर्फे नोंदवलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | निशाणी क्र. | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१. | दिलीप धोंडू यादव | ४० | नायब तहसिलदार/तक्रारदार |
| सा.क्र. २. | रोहित रमाकांत गाणार | ४२ | घटनास्थळ पंचनाम्याचा पंच |
| सा.क्र. ३. | विश्वास विष्णू नागावकर | ४३ | घटनास्थळ पंचनाम्याचा पंच |
| सा.क्र. ४. | जगन्नाथ हिरू ठाकूर | ४८ | मंडळ अधिकारी |
| सा.क्र. ५. | मनोहर रघुनाथ पडवळ | ५१ | साक्षीदार |
| सा.क्र. ६. | मंगेश बाळू इग्रुळकर | ५४ | तलाठी |
| सा.क्र. ७. | नागसेन कृष्णा दाभणे | ५७ | बांधकामाचा पंचनाम्याचा पंच |
| सा.क्र. ८. | सर्जेराव सोनोबा सोनावणे | ५८ | उपविभागीय अधिकारी/फिर्यादी |
| सा.क्र. ९. | सुदेश गणपतराव पालकर | ६५ | तपासनिक अधिकारी |

सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | ४१ | नायब तहसिलदार यांनी दाखल केलेली तक्रार |
| २. | ४९ | मंडळ अधिकारी यांनी केलेला बांधकामाचा पंचनामा |
| ३. | ५० | आरोपीच्या मिळकतीचा सातबारा उतारा |
| ४. | ५९ | उपविभागीय अधिकारी यांनी दिलेली फिर्याद. |
| ५. | ६६ | पोलीसांनी केलेला घटनास्थळ पंचनामा |

बचाव पक्षातर्फेतर्फे नोंदवलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | निशाणी क्र. | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ०९-०३-२०२६ रोजी अधिघोषीत)

आरोपीविरुद्ध प्रस्तुत खटला महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२, ५३, ५४, ५५ व भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाच्या कथनानूसार, आरोपीने मौजे नांदगाव, ता. नांदगाव येथील गट नं.५१७ क्षेत्र ०–३२–० मध्ये अनधिकृतपणे बांधकाम करुन किनारपट्टी नियमन क्षेत्राच्या अधिसूचनेचे उल्लंघान केले म्हणून तहलिसदार मुरूड यांनी तक्रारदार दिलीप धोंडु यादव (सा.क्र.१) मंडळ अधिकारी बोर्ली यांना आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यास दिनांक २०.०६.२०१५ चे पत्रानूसार प्राधिकृत केले होते. नांदगाव मंडळ अधिकारी–सा.क्र.४ व मंगेश बाळू इग्रुळकर (सा.क्र.६) तलाठी सजा नांदगाव यांनी मौजे नांदगाव, ता.मुरुड गट नं.५१७ क्षेत्र ०–३२–० येथे प्रत्यक्ष जावून पाहणी केली असता सदर मिळकतीवर एकूण ७९२ चौरस मिटर अनधिकृतपणे बांधकाम सन १९९१ नंतर केलेले दिसून आले. सा.क्र.४ व ६ यांनी सदर बांधकामाचा पंचनामा केला. त्या पंचनाम्यानुसार सदर बांधकाम समुद्र रेषेपासून २० मिटर अंतरावर महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२, ५३, ५४, ५५ व भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ च्या तरतूदींचा भंग करुन जिल्हाधिकारी यांची परवानगी न घेता अनधिकृतपणे करण्यात आले असल्याने तक्रारदार यांनी आरोपीविरूध्द तक्रार दाखल केली.

०३. सदर तक्रारीवरुन आरोपीविरुध्द मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवही क्र.–३०४३/२०१५ प्रमाणे महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२, ५३, ५४, ५५ व भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा नोंदविण्यात आला. तपासनिक अंमलदार सुदेश गणपतराव पालकर यांनी घटनेचा तपास केला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

०४. उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग (प्राधिकृत अधिकारी) यांनीसुध्दा आरोपीविरुध्द भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ अन्वये याच न्यायालयामध्ये नियमीत फौजदारी खटला क्र. ११७/२०१८ ही अतिरिक्त फिर्याद दाखल केली आहे. सदरचे अपराध एकाच आरोपीविरुध्द एकाच कृत्याबद्यल असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २१०(२) नुसार नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०१८ व नियमीत फौजदारी खटला

क्र. ११७/२०१८ एकत्रीत करुन दोन्ही प्रकरणांची सुनावणी पोलीसांनी दाखल केलेल्या दोषारोप पत्राप्रमाणे घेण्यात आली असून न्यायनिर्णय एकत्रीत देण्यात येत आहे.

०५. आरोपीविरुद्ध नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०१८ मध्ये दोन्ही प्रकरणांबाबत निशाणी क्र.३५ कडे महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२, ५३, ५४, ५५ व भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ नुसार शिक्षेस पात्र गुन्हयाचा आरोप निश्चित करुन दोषारोपातील मजकूर आरोपीला वाचून समजावून सांगीतला. आरोपीने आरोप कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली.

०६ . आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) नूसार निशाणी क्रमांक ७० कडे जबाब नोंदवण्यात आला. त्यात आरोपीने त्याचेवर खोटी केस करण्यात आली असून त्याने कोणताही गन्हा केला नसल्याचा बचाव घेतला.

०७. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील व आरोपीचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्यातील पुरावा व उभय पक्षाचा युक्तिवाद या सर्व बाबींचे अवलोकन करता न्यायीक निकालासाठी उपस्थीत झालेले मुद्दे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | १९९१ ते दि.२५.०८.२०१५ या कालावधीत मौजे नांदगाव, ता.मुरूड येथील गट नं.५१७ क्षेत्र ०–३२–० जमीनीवर आरोपीने महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ नूसार आवश्यक पूर्व परवानगी न घेता ७९२ चौ.मिटर जागेत अनधिकृत बांधकाम/ जमीनीच्या विकासाचे काम केले हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| २. | वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत दिनांक १२ जून २०१५ रोजी आरोपीस नोटीस देवून खुलासा मागवला तरी आरोपीने कोणताही खुलासा सादर केला नाही हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| ३. | वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपी करीत असलेले अनधिकृत बांधकाम थांबविण्याबाबत आरोपीस नोटीस देण्यात आली तरी आरोपीने बेकायदेशीर बांधकाम थांबवले नाही हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| ४. | वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने केलेले अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याची आरोपीस नोटीस दिल्यानंतरही आरोपीने ते काढले नाही हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ५. | वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपीने तटीय क्षेत्रात ७९२ चौ.मिटर जागेवर अनधिकृत बांधकाम व विकास काम करुन भारतीय पर्यावरण संरक्षण अधिनियमांचा भंग केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ६. | अंतिम आदेश काय? | आरोपी दोषमुक्त |

<u>निष्कर्षामागील कारणमिमांसा</u>

**मुद्दा क्र.१ ते ५ बाबतः**

०८. जगन्नाथ हिरु ठाकूर –सा.क्र.४ हे मंडळ अधिकारी व मंगेश बाळू इग्रुळकर – सा.क्र.६ हे तलाठी असून त्यांचे पुराव्यातून ध्वनित होते की, ते दिनांक १७.०७.२०१५ रोजी मौजे नांदगाव गट नं.५१७ येथे गेले होते. सदर जागेवर आरोपीने दोन बंगले ज्यापैकी एक ११ X ६ मीटर, दुसरा ३९ X १०, चार घरे प्रत्येकी ९ X ७ व एक तरण तलाव १२ X ७ मीटर असे ७९२ चौ.मीटर बांधकाम केलेले होते. सदर बांधकाम समुद्र रेषेपासून २० मीटर अंतरावर होते. त्यांनी सदर बांधकामाचे मोजमाप घेवून त्याबाबत सा.क्र.६ यांनी पंचांसमक्ष निशाणी क्र. ४९ चा पंचनामा केला. सा.क्र.६ ने पंचनाम्याबाबत तहसिलदार यांना अहवाल सादर केला.

०९. तक्रारदार दिलीप धोंडू यादव – सा.क्र.१ हे त्यावेळचे नायब तहसिलदार असून त्यांचे पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २०-०६-२०१५ रोजीच्या पत्रानुसार उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी तहसिलदार मुरुड यांना सी.आर.झेड. कायद्यांतर्गत बेकायदेशीर बांधकाम केलेल्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यास प्राधिकृत केले होते. तहसिलदार यांनी दिनांक ०७.०८.२०१५ रोजीच्या पत्रानूसार तक्रारदार यास तक्रार दाखल करण्यासाठी प्राधिकृत केले नांदगाव मंडळ अधिकारी व तलाठी सज्झा नांदगाव यांनी तपासणी करून लेखी अहवाल सादर केला होता की, आरोपीने मौजे नांदगाव गट नं.५१७ येथे ७९२ चौ.मीटर अनधिकृत बांधकाम केले आहे. आरोपीने सदर बांधकाम सी.आर.झेड. कायद्याच्या तरतूदींचे उल्लंघन करून केले म्हणून तक्रारदारने आरोपीविरुध्द मुरुड पोलीस स्टेशन येथे निशाणी ४१ कडील तक्रार दाखल केली.

१०. सर्जेराव सोनोबा सोनवणे–सा.क्र.८ (नियमीत फौजदारी खटला क्र. ११७/२०१८ मधील फिर्यादी) यांचे साक्षनुसार नोव्हेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत ते उपविभागीय अधिकारी अलिबाग म्हणून कार्यरत असतांना मौजे नांदगाव, ता. मुरूड गट नं.५१७ क्षेत्र ०–३२–० हे.आर. या मिळकतीमध्ये आरोपीने सी. आर. झेड. नियमावलीचा भंग करुन विना परवाना बेकायदेशीरपणे ७९२ चौ.मी अनाधिकृत बांधकाम केले होते. तहसिलदार मुरुड यांच्या आदेशाने मंडळ अधिकारी सज्झा नांदगाव यांनी प्रत्यक्ष घटनास्थळावर जावून केलेला

पंचनामा व सहाय्यक संचालक नगर रचना अलिबाग यांचा अहवाल हे कागदपत्र त्यांचेकडे प्राप्त झाले. पंचनाम्यानुसार सदर मिळकतीवर एकूण ७९२ चौ.मी. बांधकाम आढळून आले होते. आरोपीने पंचनाम्यानुसार सदर बांधकामापैकी काही बांधकाम अंशत: हाय वॉटर लाईनच्या आत व उर्वरित हाय वॉटर लाईनच्या बाहेर परंतू सीआरझेड क्षेत्रात पूर्णपणे समाविष्ट असल्याचे नमूद केले होते. सहाय्यक संचालक नगर रचना अलिबाग यांनी अभिप्राय दिला होता की, सदर बांधकामापैकी काही बांधकाम अंशत: हाय वॉटर लाईनच्या आत व उर्वरित हाय वॉटर लाईनच्या बाहेर परंतू सीआरझेड क्षेत्रात पूर्णपणे समाविष्ट आहे. म्हणून सा.क्र.१ ने भारतीय पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ नुसार आरोपीविरूध्द न्यायालयात निशाणी ५९ कडील फिर्याद दाखल केली. सा.क्र.८ च्या कथनानूसार त्यांचे पूर्वाधिकारी यांनी आरोपीस महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम कलम ५२ ते ५७ चा भंग केला म्हणून नोटीस दिली होती.

११. रोहित रमाकांत गाणार-सा.क्र.२ व विश्वास विष्णू नागावकर-सा.क्र.३ हे पोलीसांनी केलेल्या घटनास्थळ पंचनाम्याचे पंच असून नागसेन कृष्णा दाभणे-सा.क्र.७ हा मंडळ अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्याचा पंच आहे. सदर पंच साक्षीदारांनी पंचनाम्यावरील फक्त त्यांची सही ओळखली व त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगीतले. मनोहर रघुनाथ पडवळ-सा.क्र.५ या साक्षीदाराने तो आरोपीला ओळखत नाही, त्याला या प्रकरणाबाबत काही माहिती नाही, पोलीसांनी त्याचा जबाब घेतला नव्हता असे कथन केले आहे. सा.क्र.२, ३, ५ व ७ हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उलट तपासामध्ये विचारण्याजोगे प्रश्न विचारुन आवश्यक पुरावा आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून अभियोगपक्षास मदतीची ठरेल अशी काहीएक बाब अभिलेखावर आली नाही.

१२. सुदेश गणपतराव पालकर (सा.क्र.९) हे तपासनिक अंमलदार असून त्यांचा पुरावा तपासासंबंधी आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, गुन्हा क्र. ३०४३/२०१५ चा तपास त्याचेकडे देण्यात आला होता. त्यांनी दुस-या दिवशी नांदगाव येथील गट नं. ५१७ या घटनास्थळावर जावुन दोन पंचासमक्ष निशाणी ६६ कडील घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यांनी साक्षीदार मनोहर पडवळ याचा जबाब त्याने सांगितल्या प्रमाणे नोंदवला होता. सा.क्र ९ च्या कथनानूसार त्याने सी.आर.झेड. अंतर्गत कारवाईसाठी संबंधीत कार्यालयांना पत्रव्यवहार केला, आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१अ ची नोटीस दिली, तपासाअंती पुरेसा पुरावा दिसून आल्यावर दोषारोपपत्र उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवून दिले व त्यानंतर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

१३. अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०१८ मधील तक्रारदार– सा.क्र.१, आरोपीच्या कथीत बांधकामाचा पंचनामा करणारे मंडळ अधिकारी सा.क्र.४ व तलाठी सा.क्र.६ तसेच नियमीत फौजदारी खटला क्र. ११७/२०१८ मधील फिर्यादी सा.क्र.८ यांनी अभियोगपक्षाच्या कथनानूसार साक्ष दिली आहे. मात्र सा.क्र.४ व ६ यांच्या उलटतपासात असे आले आहे की, त्यांनी मोजमाप करण्याचे शास्त्रोक्त प्रशिक्षण घेतलेले नाही, पंचनाम्याचे वेळी भूमिअभिलेख कार्यालयाचे कर्मचारी त्यांचेसोबत हजर नव्हते, मुरुड तालुक्यात समुद्र भरती रेषा निश्चीत केलेली नाही. सा.क्र.४ व ६ यांनी मान्य केले आहे की, पंचनाम्यात आरोपीच्या कथीत बांधकामाचे अंतर अंदाजे नमूद केले आहे. याशिवाय पंचनाम्यास जाण्यापूर्वी आरोपीस लेखी नोटीस देण्यात आली नव्हती, आरोपी पंचनाम्यास हजर नव्हता. सा.क्र.४ ने असे मान्य केले आहे की, आरोपीच्या मिळकतीच्या निशाणी ५० कडील सातबारा उता-यात १९९२ पासून शेतघराची नोंद आहे. सा.क्र.४ व सा.क्र.६ यांनी उलटतपासात केलेली कथने पाहता त्यांनी केलेला पंचनामा व त्यातील मोजमाप पूर्णपणे अचूक असल्याचे गृहित धरता येणार नाही. निशाणी ४२ कडील पंचनाम्यात पंचनामा किती वाजता सुरु झाला व किती वाजता संपला, घटनास्थळाच्या चर्तु:सिमा नमूद नाही. सदर बाब पंचनाम्याच्या सत्यतेबाबत संशय निर्माण करणारी असल्याने त्यावर विश्वास ठेवणे योग्य होणार नाही.

१४. तक्रारदार-सा.क्र.१ याचे उलटतपासात असे आले आहे की, त्याने केवळ मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या अहवाल आधारे तक्रार दिली आहे, तो प्रत्यक्ष आरोपीच्या बांधकामाच्या पंचनाम्यासाठी गेला नव्हता. त्यामुळे तलाठी व मंडळ अधिकारी यांनी नक्की कोणत्या मिळकतीचा पंचनामा केला, त्यांनी मोजमाप करतांना समुद्राची कोणती उच्चतम भरती व न्युनतम ओहटी रेषा विचारात घेतली ते त्याला सांगता येणार नाही. तक्रारदारने मान्य केले की, शासनाने मुरुड तालुक्यात समुद्राची उच्चतम भरती व न्युनतम ओहटी रेषा निश्चीत केली आहे काय हे त्याला माहित नाही. त्याबाबत त्याने संबंधीत शासकीय विभागाकडून तक्रार देण्यापूर्वी खात्री करुन घेतली नाही.

१५. नियमीत फौजदारी खटला क्र. ११७/२०१८ मधील फिर्यादी–सा.क्र.८ यांचे उलटतपासातून असे दिसून येते की, सा.क्र.८ ला प्राप्त झालेला मंडळ अधिकारी यांचा पंचनामा व सहाय्यक संचालक नगर रचना अलिबाग यांनी दिलेला अभिप्राय या आधारे त्यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली होती, ते स्वतः प्रत्यक्ष घटनास्थळावर गेले नाहीत, त्यांनी भूमी अभिलेख कार्यालय व नगर रचना विभाग यांच्याकडून आरोपीच्या मिळकतीची मोजणी करून घेतली नाही, त्या कार्यालयांना पत्रव्यवहार केला नाही, त्यांनी स्वत: आरोपीला नोटीस देवून म्हणणे अथवा

खुलासा मागवला नाही. सा.क्र. ८ चे कथन आहे की, नांदगाव समुद्र किनारी उच्चतम व न्युनतम रेषा ठरविल्याच्या खुणा कायम केलेल्या नाहीत. त्यामुळे पंचनाम्यात कथीत बांधकामाचे समुद्र रेषेपासूनचे अंतर कसे नमूद केले आहे ते त्यांना सांगता येणार नाही. सदर साक्षीदार याने त्याचे उलटतपासात केलेली कथने पाहता आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी सा.क्र.८ चा पुरावा अभियोगपक्षास उपयोगी ठरणारा नाही.

१६. महत्वाची बाब म्हणजे सा.क्र.४ व ८ यांनी मान्य केल्यानूसार आरोपीच्या मिळकतीचा निशाणी ५० कडील ७/१२ उता-याच्या पीकपाणी नमूद करायच्या रकान्यात १९९२ पासून घर असल्याची नोंद आहे. अभियोगपक्षाकडून कथीत बांधकाम कधी करण्यात आले याबाबत कोणताही विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सदर बांधकाम आरोपीने मिळकत विकत घेण्यापूर्वी केलेले होते की, मिळकत विकत घेतल्यानंतर आरोपीने केले ही बाब निसंकोचपणे स्पष्ट झालेली नाही.

१७. प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार सा.क्र.१–नायब तहसिलदार यास तहसिलदार यांनी प्राधीकृत केले असून केंद्रशासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत तहसिलदार यांना त्यांच्या कनिष्ठ कर्मचा–यांमार्फत गुन्हा किंवा तक्रार दाखल करण्याचे किंवा कनिष्ठ कर्मचा–यांना असे अधिकार हस्तांतरीत करण्याचे अधिकार आहेत याबाबत अभियोगपक्षाने शासनाची अधिसूचना, परिपत्रक अथवा कायदेशीर तरतूद असल्याचे दाखवून दिले नाही. महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत तहसिलदार यांना असे अधिकार असल्याचे नमूद नाही. यावरुन सा.क्र.१ ने आरोपीविरुध्द दाखल केलेली तक्रार निशाणी ४१ ही सक्षम व्यक्तीने दिलेली नसल्याने कायदेशीर नसल्याचे स्पष्ट होते.

१८. उपविभागीय अधिकारी असलेल्या सा.क्र.८ यांना महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ नूसार तक्रार दाखल करण्यास शासन परिपत्रक/राजपत्र अन्वये प्राधीकृत केलेले असल्याने त्यांनी दाखल केलेली निशाणी ५९ कडील फिर्याद कायदेशीर आहे असे गृहित धरल्यास सा.क्र.८ यांनी फिर्याद दाखल करण्यापूर्वी आरोपीला महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५३, ५४ व ५५ नूसार नोटीसा देणे आवश्यक होते. मात्र सा.क्र.८ ने त्यांचे उलटतपासात फिर्याद दाखल करण्यापूर्वी आरोपीला त्यांनी स्वत: अशी नोटीस दिली नसल्याचे मान्य केले आहे. त्यांचे पुर्वाधिकारी यांनी नोटीस दिल्याचे सा.क्र.८ चे कथन असले तरी अशाप्रकारे आरोपीला नोटीस तामील झाल्याबाबत काहीएक पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा परिस्थीतीत सा.क्र.८ ने कायदेशीर तरतूदींचा योग्यप्रकारे अवलंब करुन फिर्याद दाखल

केली असे म्हणता येणार नाही. एकंदरीत अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरून आरोपीने प्रस्तुत गुन्हा केल्याचे संशयापलिकडे सिध्द झालेले नाही.

१९. आरोपीविरुध्दचा दोषारोप निःसंशयपणे सिध्द होईपर्यंत आरोपी निर्दोष आहे हे फौजदारी कायदयाचे मुळ गृहीतक आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपीने प्रस्तुत गुन्हा केल्याबाबत काहीएक ठोस व सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने मी मुद्दे क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे.

**मुददा क्र. ६ बाबत –**

२०. मुद्दा क्र. १ ते ५ च्या निष्कर्षान्वये आरोपीविरुद्धचा अपराध सिध्द झालेला नसल्याने ती निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. सबब मुद्दा क्र. ६ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| ०१. | आरोपी **राजेश सुंदरलाल बहल,** ह्यास नियमीत फौजदारी खटला क्र. ७४/२०१८ मधून फौजदारी प्रक्रिया सहींतेच्या कलम २४८(१) अन्वये त्याच्यावर लावण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२, ५३, ५४, ५५ व भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| ०२. | आरोपी **राजेश सुंदरलाल बहल,** ह्यास नियमीत फौजदारी खटला क्र. ११७/२०१८ मधून फौजदारी प्रक्रिया सहींतेच्या कलम २४८(१) अन्वये त्याच्यावर लावण्यात आलेल्या भारतीय पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| ०३. | आरोपीचा जामीन कदबा व जातमुचलका रद्द करण्यात येतो. |
| ०४. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया सहींतेच्या कलम ४३७–अ प्रमाणे रुपये १५,०००/– चा जामीन कदबा व जातमुचलका सादर करावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2026.03.11 14:54:26 +0530

दिनांक : ०९-०३-२०२६

(घनःशाम रा. तिवारी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
मुरुड, जि. रायगड–अलिबाग.